# अनामप्रेम स्नेहवार्ता

स्थापना 2005
अनामप्रेम
दिव्यांग हिताय, नित्य समर्पण



## अनामप्रेम - मासिक वृत्तपत्रिका

**February - 2026**



Scanned with OKEN Scanner






**संस्थेतील एकूण ७ दिव्यांग विद्यार्थी दहावी बोर्ड परीक्षेला बसले असून, बारावी वर्गातील एकूण १८ विद्यार्थी बोर्ड परीक्षेला बसले आहेत.**



**पुणे येथे 'रन इनसिंक 2.0' मॅरेथॉनमध्ये अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांचा सहभाग**

**पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या Run InSync 2.0 या समावेशक मॅरेथॉन स्पर्धेत अनामप्रेम संस्थेच्या अंध, अस्थिव्यंग व मूकबधिर विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. ३, ५ व १० कि.मी. गटांमध्ये झालेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी जिद्द आणि आत्मविश्वासाने धाव पूर्ण करत उल्लेखनीय कामगिरी केली. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पदकांनी सन्मानित करण्यात आले.**



Scanned with OKEN Scanner



कु. मिस्टी गोयल हिचा ७वा वाढदिवस अनामप्रेम हिम्मतभवन येथे गोयल परिवारासह आनंदात साजरा करण्यात आला.




**चॉकलेट वाइब ग्रुप व केविन नायर यांच्या पुढाकारातून नगर कॉलेजमधील स्टॉलच्या नफ्यातील ५०% रक्कम अनामप्रेम संस्थेसाठी शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी देण्यात आली—ही सामाजिक बांधिलकीची सुंदर जाणीव.**









## न्यू आर्ट्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे अनामप्रेममध्ये श्रमदान

अहिल्यानगर येथील New Arts, Commerce and Science College, Ahmednagar च्या सांख्यिकी विभागातील विद्यार्थ्यांनी Anamprem Sanstha च्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात ९ ते १३ फेब्रुवारी दरम्यान ३० तासांचे श्रमदान करत सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले. परिसर स्वच्छता, कौशल्य विकास केंद्रातील मदत तसेच दिव्यांगांच्या दैनंदिन उपक्रमांत सहकार्य अशा विविध कामांत विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

या सेवाभावी कार्याची दखल घेऊन १६ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित छोटेखानी समारंभात सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक संवेदनशीलता व सहकार्याची भावना अधिक दृढ झाली.



Scanned with OKEN Scanner



अनामप्रेम संस्थेच्या विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश - लुईस ब्रेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय दृष्टिहीन संघ विभागीय शाखा नाशिक, आयोजित स्पर्धेत जनरल नॉलेजमध्ये द्वितीय क्रमांक मिळवत विद्यार्थ्यांनी संस्थेचा गौरव वाढवला.



फ्लेम युनिव्हर्सिटी, पुणे येथे अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांचा स्टॉल.

शारदा सुगम संगीत संस्था,कल्याण आयोजित सुगम संगीत परीक्षेमध्ये, अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांची उज्ज्वल कामगिरी..!
६ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणांसह यश मिळवत संस्थेचा गौरव वाढवला.






इन्फोसिस, हिंजवडी (पुणे) येथे दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या उत्पादनांचा विक्री स्टॉल लावण्यात आला होता.



Scanned with OKEN Scanner

# पाहुण्यांच्या संस्था भेटी





मुंबई ग्राहक पंचायत, ठाणे विभागातील मान्यवरांनी अनामप्रेम संस्थेच्या 'सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प' निंबळक येथे दिलेली सदिच्छा भेट अत्यंत प्रेरणादायी ठरली. सामाजिक संस्थांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या कार्याला मन:पूर्वक सलाम. अशा सहकार्यामुळे दिव्यांग मुलांच्या स्वावलंबनाच्या वाटचालीला नवी ऊर्जा मिळत आहे.

न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगरच्या केमिस्ट्री विभागाने अनामप्रेम संस्थेस भेट देत शैक्षणिक साहित्याची मदत केली तसेच लेखनिक सहाय्याचे आश्वासन दिले—ही खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी.









Scanned with OKEN Scanner

# सामाजिक बांधिलकीतील नवे उपक्रम

नवा मराठा
epaper.enavamaratha.com
19 Feb 2026 - Page 5



महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांबरोबरच इतर राज्यांतील दिव्यांग बांधवांनीही या स्पर्धेत सहभाग नोंदविला. ३ कि.मी., ५ कि.मी. आणि १० कि.मी. अशा तीन गटांमध्ये ही धाव स्पर्धा पार पडली.

## पुणे येथे 'रन इनसिंक २.0' मॅरेथॉनला प्रतिसाद; 'अनामप्रेम' च्या 'दिव्यांग विद्यार्थ्यांची' कामगिरी

नगर – Adventures Beyond Barriers Foundation यांच्या वतीने पुण्यातील युनिव्हर्सिटी ग्राउंडवर "Run InSync 2.0' या भारतातील सर्वात मोठ्या समावेशक धाव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. समानता, समावेशकता आणि 'क्षमता हीच ओळख' या संदेशाला अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमाला राज्यासह देशभरातून प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांबरोबरच इतर राज्यांतील दिव्यांग बांधवांनीही या स्पर्धेत सहभाग नोंदविला. ३ कि.मी., ५ कि.मी. आणि १० कि.मी. अशा तीन गटांमध्ये ही धाव स्पर्धा पार पडली. विशेष म्हणजे, अनामप्रेम संस्थेच्या अंध, अस्थिव्यंग व मूकबधिर विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सक्रिय सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी बजावली.

स्पर्धेत सहभागी झालेल्या अनामप्रेमच्या खालील कार्यकर्ते व विद्यार्थ्यांना पदकांनी सन्मानित करण्यात आले. त्यांच्या जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाचे उपस्थितांनी कौतुक केले. या यशामुळे इतर दिव्यांग विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात पुढे येण्याची प्रेरणा मिळणार आहे.

पदक विजेते कार्यकर्ते व विद्यार्थी यामध्ये अजय धोपावकर, आनंद माळवे, राहुल खिरोडे, सुरेखा राठोड, रामदास काकडे, अक्षय राऊत, ऋषिकेश पाटील, आनंद हलकडे, अजय गवळी, श्रीनिवास परिहार, कल्लेश्वर लोहार, अविनाश कोळेकर, किशोर भेंडाळे, गौरव घाडगे, कुणाल माने, स्वाती गारुडे, रेश्मा गुंडेवार, स्नेहा कोळी, ओमकार सोनकर आणि आशिष पोकळे यांचा समावेश आहे. या सर्वांचे अनामप्रेमचे अध्यक्ष इंजि. अजित माने, सचिव अनिल गावडे, संचालक अभय रायकवाड व डॉ. मेघना मराठे यांनी अभिनंदन केले.



अनामप्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी गोविंदपुरा, गुरुद्वारा अहिल्यानगर येथे आरोग्य तपासणी शिबिर मध्ये सर्व मुलांच्या आरोग्य तपासणी करण्यात आली — सेवेच्या माध्यमातून आरोग्याची जपणूक.







**अनामप्रेमच्या विविध वस्तीगृहातील विद्यार्थ्यांसाठी श्री. वामन कांबळे, देवांश नायर तसेच इतर उदार देणगीदार यांच्या सहकार्याने स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.**



Scanned with OKEN Scanner





**अनामप्रेमच्या गौरांग अभिनव शाळेत थोर महापुरुषांच्या जयंती उत्साहात साजऱ्या करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी भाषणे, गीत व सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे त्यांच्या कार्याला अभिवादन केले. या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सामाजिक जाणीव व प्रेरणादायी विचारांची जागृती करण्यात आली.**






**“एक कदम और” संस्थेचा ग्रॅज्युएशन डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अनामप्रेम संस्थेच्या सहयोगाने करत असलेल्या कार्याला एक वर्ष पूर्ण झाल्याने तसेच शिवजयंती सोहळ्याच्या निमित्ताने हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**
**मागील वर्षभरात विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम बनविण्यात आले. या यशस्वी प्रवासाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.**



Scanned with OKEN Scanner

# “संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कष्टातून उभी राहिलेली फळबाग आणि भाजीपाला शेती..







अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक तसेच यशवंत प्रकल्पातील माळरान आज दिव्यांग विद्यार्थ्यांच्या परिश्रमाने हिरवेगार झाले आहे. पेरू, केशर आंबा, चिकू, सीताफळ, रामफळ, चिंच, बोर, फणस अशा विविध फळझाडांची लागवड करून विद्यार्थी त्यांची प्रेमाने जोपासना करत आहेत. तसेच श्रमदानातून सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला व फळभाज्यांची शेती करून सध्या प्रकल्पातील सुमारे २०० लोकांच्या गरजा पूर्ण करणारा ताजा अन्नपुरवठा तयार करत आहेत. ही शेती केवळ उत्पादन नाही, तर स्वावलंबन, आत्मविश्वास आणि श्रमसंस्कारांचे जिवंत उदाहरण आहे.










Scanned with OKEN Scanner

# अनामप्रेम - फेब्रुवारी - 26 वसतिगृहनिहाय विद्यार्थी संख्या




हिंमतभवन वसतिगृह

लाभार्थी 51



गौरांग वसतिगृह

लाभार्थी 16



सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प

लाभार्थी 94



यशवंत प्रकल्प आधारग्राम

लाभार्थी 5




अनामप्रेम पुणे वसतिगृह

लाभार्थी 12



मराठवाडा वसतिगृह

लाभार्थी 10



## अनामप्रेम संचालित प्रकल्पातील एकूण लाभार्थी संख्या 188

# अनामप्रेम मराठवाडा वसतीगृहातील अपडेट.

## रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद ईस्टसोबत स्नेहबंध अधिक दृढ



हिन्दुस्तान केसरी एक्सप्रेस न्युज

### रोटरी क्लबनी अनाम प्रेम संस्थेला ८ बंक बेड्सची अनमोल भेट दिली

(अलकनंदा मोरे,छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी):छत्रपती संभाजीनगर ईस्ट रोटरी क्लबने व त्यांच्या ट्रस्टने गारखेडा येथील अनामप्रेम संस्थे ला८ बंक बेड्सचे दुमजली पलंग 16 विद्यार्थ्यांसाठी सोयीची अनमोल भेट दिली. हे दान मोफत निवास व भोजन पुरवणाऱ्या अनाम प्रेम सेवाभावी संस्थेसाठी आहे. कार्यक्रमाची अध्यक्ष रो. दिनकर अरबाळे यांनी केली. रोटरीची औपचारिक बैठक सचिव रो. अशोक तोष्णीवाल व माजी अध्यक्ष रो. प्रदीप पटेल यांनी घेतली.प्रमुख अतिथी रोटरी ट्रस्टचे अध्यक्ष रो. अनिमेश सिंगजी (शहरातील विविध संस्थांना मोठ्या रकमेचे दान देणाऱ्या उदार दाते कुटुंबातील सदस्य, नाव प्रसिद्धी अपेक्षित नसलेले) यांनी अशा कारणांसाठी दान करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी प्रत्येकाने यथाशक्ती कोणत्याही स्वरूपात योगदान द्यावे;असे आवाहन केले.सन्माननीय अतिथी रो. दिनकर अरबाळे यांनी उपक्रमाचे कौतुक केले व वैयक्तिक ५,००० रुपयांचे दान जाहीर केले. क्लबचे कम्युनिटी डायरेक्टर रो. गोविंद दुसांगे यांनी प्रकल्पाची माहिती दिली व अनाम प्रेमला संधीबद्दल धन्यवाद दिले.अनाम प्रेमचे श्री जे. आर.मंत्री यांनी संस्थेची माहिती दिली दानाबद्दल आभार मानले, अनुदानित नसलेल्या उगवत्या संस्थेची माहिती दिली व नुकतेच संस्थेने खरेदी केलेल्या (दान मिळालेल्या) प्लॉट वर भविष्यातील बांधण्यात येणाऱ्या इमारतीची संस्थेच्या भविष्यातील उपक्रमाची सविस्तर माहिती दिली . सौ विनया कांबळे यांनी आभार मानले.विशेष अतिथींमध्ये पीडीजी (माजी जिल्हा प्रांतपाल) रो. रुखमेश जखोटिया, वरिष्ठ रोटरीअन राम मंत्री, अरुण पचासिया, विश्वनाथ बोराडे व संतोष आनंदे, तसेच जेष्ठ नागरी सेवाभावी संघटनेचे श्री विजय म्हैसेकर सौ.वीणा म्हैसेकर सौ. ज्योती मुळे , रमेश दुसे, रमेश कुलकर्णी, विष्णुजी व्यास , प्रा. जे. डी.कोपरकर उपस्थिती होती.हा उपक्रम रोटरीच्या सामाजिक सेवा व दुर्बल घटकांच्या शिक्षणासाठीच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

अलकनंदा मोरे
विशेष बातमी



अनामप्रेम संस्थेत आयोजित छोटेखानी पण अर्थपूर्ण सोहळ्यात रोटरी क्लबच्या मान्यवरांच्या उपस्थितीत बंक बेडचे लोकार्पण करण्यात आले. या वेळी विविध पदाधिकारी, रोटरियन व स्थानिक हितचिंतक सहभागी झाले होते.

मागील वर्षीप्रमाणेच यंदाही रोटरी क्लबकडून मिळालेल्या सहकार्यामुळे संस्थेच्या कार्याला मोठी चालना मिळत असून, या भेटीतून परस्परांतील नाते अधिक घट्ट व मजबूत झाले.



अनामप्रेम संस्थेस ज्येष्ठ नागरिक संस्थेचे सदस्य मा. श्री. जनार्दन बाजीराव पाटील यांच्याकडून मदत प्राप्त..

मराठवाडा प्रकल्पाशी एकामागोमाग एक व्यक्ती जोडली जात असून सेवाभावाची ही साखळी अधिक बळकट होत आहे.



Scanned with OKEN Scanner



# अंधारातून उजेडाकडे – डॉ. राहुल बबन पेटारे

१० सप्टेंबर १९९९ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील राहता तालुक्यातील अस्तगाव या छोट्याशा, साध्या पण संस्कारसंपन्न गावात राहुल बबन पेटारे याचा जन्म झाला. जन्मत: अंधत्वाची कठीण साथ लाभली असली, तरी त्याच्या आयुष्याच्या वाटचालीत अंधाराने कधीही घर केले नाही. उलट, आपल्या जिद्दीच्या तेजाने त्याने त्या अंधारालाच उजेडात परिवर्तित केले—आणि स्वतःचा वेगळा, प्रेरणादायी मार्ग निर्माण केला.

लहानपणापासूनच संघर्ष हा त्याच्या आयुष्याचा अविभाज्य भाग होता. नॅब, श्रीरामपूर येथे पहिली ते सातवीपर्यंतचे शिक्षण घेताना त्याने केवळ अक्षरज्ञानच नाही, तर जीवनाशी दोन हात करण्याची शिकवण घेतली. त्यानंतर एकनाथराव विठ्ठलराव विखे पाटील विद्यालय, बाभळेश्वर येथे त्याने माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. या प्रवासात अनेक अडथळे, मर्यादा आणि अनिश्चिततेचे क्षण आले; कधी मार्ग दिसेनासा झाला, कधी आशेचा किरणही धूसर वाटू लागला—परंतु "हार मानणे" हा शब्द त्याच्या जीवनात कधीच स्थान मिळवू शकला नाही.

याच संघर्षमय टप्प्यावर त्याच्या आयुष्यात अनामप्रेम संस्थेचा प्रवेश झाला—आणि जणू त्याच्या जीवनाला नवी दिशा, नवे पंख लाभले. संस्थेतील सुसंस्कृत शैक्षणिक वातावरण, प्रेमळ गुरुजनांचे मार्गदर्शन आणि सर्वसमावेशक सुविधा यामुळे राहुल याच्या व्यक्तिमत्त्वाला नवसंजीवनी मिळाली. मोबिलिटी प्रशिक्षण, एम.एस.सी.आय.टी. शिक्षण आणि विविध विकासात्मक उपक्रमांमुळे त्याचा आत्मविश्वास दुणावला आणि त्याने यशाची नवी क्षितिजे गाठण्यास सुरुवात केली.

साध्या, कष्टकरी कुटुंबात वाढलेल्या राहुल याच्या आयुष्याची खरी ताकद म्हणजे त्याचे आई-वडील—वडील बबन बाबुराव पेटारे हे मजुरी करून संसार सांभाळणारे परिश्रमी व्यक्तिमत्त्व, तर आई मंदाकिनी पेटारे या प्रेमळ, त्यागमूर्ती गृहिणी. त्यांच्या निस्वार्थ प्रेमाने आणि अखंड पाठबळाने राहुल याच्या स्वप्नांना बळ मिळाले. दोन अंध भाऊ आणि एका बहिणीच्या सहवासात वाढलेले हे कुटुंब म्हणजेच त्यांच्या यशाचा भक्कम आधारस्तंभ ठरले.



Scanned with OKEN Scanner

“शिक्षणाच्या जोरावर सन्मानाची नोकरी मिळवणे” हे राहुल याचे स्वप्न आहे—आणि त्या स्वप्नाच्या दिशेने तो आजही न थकता, न डगमगता वाटचाल करत आहे.

परंतु राहुल याची ओळख केवळ इथेच थांबत नाही…
“एका हाताने टाळी वाजत नाही” या सर्वमान्य म्हणीला त्याने आपल्या कृतीतून ठाम आव्हान दिले. अथक परिश्रम, चिकाटी आणि अविचल आत्मविश्वास यांच्या बळावर त्याने एका हाताने टाळी वाजवण्याचे अद्भुत कौशल्य आत्मसात केले—जे अनेकांसाठी अशक्यप्राय वाटणारे होते. त्याच्या या विलक्षण कामगिरीची दखल घेऊन इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये त्याची नोंद करण्यात आली आणि त्याच्या कार्याला मानाचा मुजरा म्हणून त्याला मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली.

“प्रयत्नांती परमेश्वर” या म्हणीचा प्रत्यय त्यांच्या प्रत्येक कृतीतून येतो. अंधत्व ही मर्यादा न ठरता त्यांनी तिला आपल्या सामर्थ्यात रूपांतरित केले. त्यांच्या जिद्दीने आणि कर्तृत्वाने हे सिद्ध केले की—
मर्यादा शरीरात नसतात, त्या मनात असतात; आणि मन जिंकलं की जग जिंकता येतं.

आज डॉ. राहुल बबन पेटारे हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नाही, तर हजारो दिव्यांग, युवक आणि सामान्य माणसांसाठी प्रेरणेचा जाज्वल्य दीपस्तंभ आहेत—अंधारातही उजेड शोधण्याची, आणि स्वतः उजेड बनण्याची शिकवण देणारे!

त्याच्या जीवनप्रवासातून उमटणारा ठाम संदेश असा

“शारीरिक अपंगत्व यशाला अडवत नाही; यशाच्या मार्गातील खरी अडचण असते ती मनातील भीती… आणि जी व्यक्ती भीतीवर विजय मिळवते, तीच खऱ्या अर्थाने जीवन जिंकते..!"








Scanned with OKEN Scanner

संस्थेतील दिव्यांग बांधवांच्या कौशल्यातून बनवण्यात आलेल्या दर्जेदार वस्तू

# अनामप्रेम कौशल्य विकासालय अंतर्गत कौशल्य निर्मिती



हवाई चप्पल, क्रॉक्स

दिव्यांग निर्मित उत्पादने खरेदी करुन त्यांना रोजगारक्षम बनवा.

नॅपकिन बुके, सॅनिटरी पॅड

**संपर्क - अनामप्रेम, गांधी मैदान, अहिल्यानगर 9011918786/7350013805**



मुख्य ऑफिस (गांधी मैदान) : 9011004576, 9422054956
सत्यमेव जयते ग्राम (निंबळक) : 7350517778, 7350013805
यशवंत प्रकल्प (इसळक) : 9011918786, 9422307116

कौशल्य विकास केंद्र, निंबळक : 9011918786, 8788548677
पुणे प्रकल्प : 9011750022, 9372404963
छ.संभाजीनगर प्रकल्प : 9011750035, 9921509199

## देणगी देण्याकरीता बँक तपशिल

| Bank Name | State Bank Of India |
| --- | --- |
| Name Of Account | ANAMPREM |
| Branch | Kalyan road ( SME ), Ahilyanagar (Ahmednagar) |
| Account No | 32144934687 |
| Account Type | Current |
| IFSC Code | SBIN0014794 |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला anampreminfo@gmail.com या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.



Scanned with OKEN Scanner